| | |
|---|---|
| **MHBI100009182026** | **फौजदारी किरकोळ अर्ज क्र. १२४/२०२६**<br>**रत्नाकर सखाराम घुले –विरुद्ध– महाराष्ट्र शासन** |

## निशाणी क्र. ०१ वरील आदेश

अर्जदार याने प्रस्तुतचा अर्ज केज पोलीस ठाणे गुन्हा रजि. क्र.२६८/२०२६ मधील महिंद्रा स्कॉर्पीओ मॉडेल S3 जिचा वाहन क्र. MH 28 AZ 6443, चेसिस नं. **MA1TA2TDKK2J29673** इंजिन नं. TDK4J91812 परत मिळण्यासाठी या न्यायालयात भारतीय नागरीक सुरक्षा संहिता ५०३ प्रमाणे अर्ज केला आहे.

०२) अर्जदाराचे म्हणणे असे आहे की, सदर वाहन हे केज पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर क्रमांक २६८/२०२६ कलम १२३, २२३, २७४ व २७५ भारतीय न्याय संहिता, २०२३ अन्वये तपास कामासाठी जप्त केले आहे. सदर वाहन रत्नाकर सखाराम घुले यांच्या मालकीची आहे. सदर वाहन अर्जदाराला आवश्यक आहे. सदर वाहन पोलिस स्टेशनला एकाच ठिकाणी उभे असल्याने वाहनास गंज लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे अर्जदाराचे अतोनात कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. सदर वाहनाच्या रंगामध्ये किंवा स्वरुपामध्ये कोणताही बदल करणार नाही अथवा हस्तांतर करणार नाही. तसेच तपासकामी आवश्यकता भासल्यास सदर वाहन हजर करण्यास अर्जदार तयार आहे. याशिवाय मा. न्यायालयाच्या अटी शर्तीचे काटेकोरपणे पालन करण्यास तयार आहे.

३) सदरच्या अर्जावर तपासी अंमलदार, सरकारी अभियोक्ता यांचे म्हणणे मागविले. सरकारी अभियोक्ता यांनी कथन केले की, आरोपीने गंभीर स्वरूपाचा गुन्हा करताना सदर स्कार्पीओ गाडीचा वापर केलेला आहे. सदर गुन्हा हा न्याय प्रविष्ठ असुन तपासकामी व पुराव्याकामी गाडीची आवश्यकता भासु शकते. अर्जदारास गाडी परत केली तर आरोपी परत या गाडीचा वापर गुन्हा करण्यासाठी करू शकतो व अर्जदार गाडीची विक्री करू शकतो. अर्जासोबत गाडीचे मुख्य कागदपत्र दिसुन येत नसल्याचे कथन करुन अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे. तपास अधिकारी यांनी या अर्जावर नि. क्र. ५ वर म्हणणे देवून कथन केले की, गुन्हयाचा तपास चालु असुन अर्जदार यांना गाडी परत केल्यास ते त्यास बदल अथवा विक्री करण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब, अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

०४) अर्जदाराचे विधीज्ञ श्री सी.वाय.जाधव आणि सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री एस. एन. अंबेकर यांचे युक्तिवाद ऐकले. अभिलेखात दाखल केलेला अर्ज त्यासोबतचे शपथपत्र व दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. अर्जदाराने शपथेवर सांगीतले आहे की, जप्त वाहन त्याच्या मालकीचे आहे. अर्जदाराने आधारकार्डची पडताळणी प्रत, अर्जदाराचे आर.सी बुक ची पडताळणीकृत प्रत, वाहनाचा विमा भरल्याची पावतीची पडताळणीकृत प्रत, एफ.आय.आर ची छायांकित प्रत, पी.यु.सी, इ. दाखल केले आहे. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता जप्त वाहन रत्नाकर सखाराम घुले यांच्या नावे असल्याचे दिसुन येत आहे. अर्जदार हा अर्जातील नमूद वाहनाचा मालक असल्याचे अभिलेखावरुन प्रथमदर्शनी दिसून येते. तसेच अद्याप अर्जदाराव्यतिरिक्त इतर कोणीही प्रस्तुतच्या वाहनाचे मागणी केलेली नाही. **सुदंरभाई अंबालाल देसाई विरुध्द गुजरात राज्य ए. आय. आर २००३ मा. सर्वोच्च न्यायालय ६३८** या न्याय निर्णयातील मा. सर्वोच्च न्यायालयाचे मार्गदर्शक तत्वानुसार आशा जप्त मुद्येमालासंबंधी त्वरीत आदेश करणे आवश्यक आहे. तरी खटल्याच्या सुनावणी दरम्यान सदर वाहनाची आवश्यकता पडू शकते. मात्र त्याकरिता सदर वाहनाची छायाचित्रे काढून त्याचा अंतर्भाव पुराव्यामध्ये ठेवणे शक्य आहे. सदर वाहन सद्य स्थितीत पोलीस ठाण्यात पडून असून सदर परिस्थिती कायम राहिल्यास वाहनाची उपयुक्तता संपुष्ठात येवू शकते.

०५) वरील सर्व बाबींचा सारासार विचार करता जप्त वाहन काही अटी व शर्तीवर अर्जदारास परत करणे योग्य वाटते. त्याकरिता खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आ दे श

१} प्रस्तुतचा अर्ज खालील अटी व शर्तींवर मंजूर करण्यात येतो.

२} **अ.** पोलिस ठाणे, केज येथील अपराध क्र. २६८/२०२६ मधील जप्त करण्यात आलेली महिंद्रा स्कॉर्पीओ मॉडेल S3 जिचा वाहन क्र. MH 28 AZ 6443, चेसिस नं. **MA1TA2TDKK2J29673** इंजिन नं. TDK4J91812 हे वाहन अर्जदार नामे रत्नाकर सखाराम घुले यास ८,००,०००/- (रुपये आठ लाख मात्र) चे सुपूर्तनाम्यावर देण्यात यावा.

**ब.** अर्जदार सदर वाहनाचा कुठल्याही प्रकारे दुरुपयोग करणार नाही किंवा त्याची विल्हेवाट लावणार नाही.

**क.** अर्जदार सदर वाहनामध्ये, रंगामध्ये कोणताही बदल करणार नाही किंवा हस्तांतर करणार नाही किंवा विकणार नाही.

**ड.** तपासीक अंमलदार यांना तपासकामी अथवा न्यायालय यांना आवश्यकता असेल त्यावेळी अर्जदार सदरचे वाहन ज्याचा नं. MH 28 AZ 6443 तपासीक अंमलदार अथवा न्यायालय यांचे समक्ष हजर करेल.

**इ.** अर्जदाराने सदर वाहनाच्या सर्व कागदपत्रांच्या स्वसाक्षांकित प्रती तपासी अधिकारी यांच्याकडे सादर कराव्यात.

**३}** तपासी अधिकाऱ्यास आदेशित करण्यात येते की,

**अ.** सदर वाहनाची चारही बाजूंनी छायाचित्रे काढून त्यावर अर्जदाराच्या स्वाक्षऱ्या घ्याव्यात.

**ब.** सदर वाहन अर्जदारास परत केल्याबाबत योग्य तो पंचनामा तयार करावा.

**क.** सुपूर्तनामा, वाहन अर्जदारास परत केल्याचा पंचनामा आणि वाहनाची छायाचित्रे हे सर्व दस्तऐवज दोषारोपपत्रा सोबत दाखल करावीत.

**४}** प्रस्तुत आदेशाबाबत तपासी अधिकाऱ्यास कळविण्यात यावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by SURESH SUBHASH BADGUJAR
Date: 2026.06.03 16:27:02 +0530

ठिकाण :– केज
दिनांक :– ०३.०६.२०२६

**(सुरेश सु. बडगुजर )**
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, केज
जिल्हा बीड.

CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file are word to word as per original judgment/ order.

Dictated on : 03.06.2026
Transcribed on : -----
Checked & signed on : 03.06.2026

Sd/-
(P. P. Raut),
Stenographer Gr-3
Ct. of CJJD and JMFC, Kaij.